पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८.
वैद्यकीय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/१४/कावि/८७७/२०१६
दिनांक २३/१२/२०१६

**विषय - सेवानिवृत्त कर्मचा-यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे सभासद करुन घेणेबाबत ...**

**संदर्भ** - धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३.

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आली आहे.

धन्वंतरी योजना धोरणातील तरतुदीनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांव्यतिरिक्त महापालिका आस्थापनवरील सर्व कर्मचा-यांना सदरची योजना बंधनकारक आहे. त्यानुसार कर्मचा-यांचे वेतनातुन योजनेची वर्गणी कपात करण्यात येत आहे. सेवानिवृत्त कर्मचा-यांना सदरची योजना ऐच्छिक असल्यामुळे त्यांचे विनंती अर्जाशिवाय त्यांना योजनेचे सभासद करुन घेता येत नाही.

कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे धन्वंतरी योजनेचे सभासदत्व संपुष्टात येते ही बाब सदर कर्मचा-यांना माहित नसते. योजनेचे सभासदत्व नसल्यामुळे अशा कर्मचा-यांना योजनेमधून उपचार देय होत नाहीत. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचा-यांवर मोठा अर्थिक बोजा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सेवानिवृत्त कर्मचा-यांना अशा प्रसंगाना तोंड द्यावे लागू नये म्हणून कर्मचा-यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर धन्वंतरी योजनेचे पुन्हा सभासद होणे आवश्यक आहे. यासाठी सदरची माहिती त्यांना असणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिका आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना सूचित करणेत येते की, ते नियमित वेतनश्रेणीत कार्यरत असेपर्यंतच त्यांचे धन्वंतरी योजनेचे सभासदत्व कायम असते. कर्मचारी सेवानिवृत्त झालेनंतर त्यांचे सभासदत्व संपुष्टात येते. त्यामुळे सेवानिवृत्त झालेनंतर कर्मचा-यांनी पुन्हा योजनेचे सभासदत्वाचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सदरची प्रक्रीय लेखा विभागाकडून पुर्ण केली जाते.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.

प्रति,
सर्व संबंधित शाखाप्रमुख
विभाग

२/- सदरचे परिपत्रक सर्व कर्मचा-यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.